आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

४ नोव्हेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपली, कोल्हापूर उत्तर मतदारसंघातून काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराची

- सदा सरवणकर, समीर भुजबळ निवडणूक रिंगणात, तर गोपाळ शेट्टी, उदय बने, रमेश कदम यांची माघार

- राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली/ कार्यभार मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्याकडे

**आणि**

- देशातल्या शेअर बाजारात मोठी घसरण, सेन्सेक्स ७९ हजारांच्या आणि निफ्टी २४ हजारांच्या खाली

**<><><><><>**

राज्यात २० तारखेला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी चित्र आज स्पष्ट झालं. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी अनेक उमेदवारांनी अर्ज मागे घेतले तरी बंडखोरी पूर्णपणे शमलेली नाही.

मुंबई उपनगर जिल्ह्यातल्या २६ मतदारसंघातून आज ५३ जणांनी माघार घेतली. बोरिवली विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणारे भाजपचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी निवडणुकीतून माघार घेण्याची घोषणा केली. **माहीम** विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेचे आमदार सदा सरवणकर निवडणूक लढवणार आहेत. राज ठाकरे यांच्याशी आपली भेट नियोजित होती मात्र,

त्यांनी भेट घ्यायला नकार दिल्यानं आपण ही निवडणूक लढवणार असल्याचं सरवणकर यांनी जाहीर केलं.

**नवी मुंबईतल्या** बेलापूर मतदारसंघातून ९ उमेदवारांनी आपले अर्ज माघारी घेतले आहेत. **रत्नागिरी** विधानसभा मतदारसंघातले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उदय बने यांनी अपक्ष उमेदवारीचा अर्ज मागे घेतला आहे. मात्र **राजापूरमधून** काँग्रेसच्या अविनाश लाड यांनी उमेदवारी कायम ठेवली आहे. **सिंधुदुर्ग** जिल्ह्यात सावंतवाडी वगळता कुडाळ आणि कणकवली मधून प्रत्येकी दोघांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता सावंतवाडी आणि कणकवलीतुन प्रत्येकी ६ तर कुडाळ मधून ५ उमेदवार रिंगणात आहेत. **धुळे** जिल्ह्यातल्या पाचही मतदार संघातल्या ४६ उमेदवारांनी निवडणुकीतून माघार घेतली असून आता पाचही मतदार संघातून ५६ उमेदवार हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

**पुणे** जिल्ह्यातल्या ४८२ अर्जांपैकी १७९ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने आता ३०३ उमेदवारांमध्ये लढत होईल. **नाशिकमधल्या** १५ विधानसभा मतदारसंघांत एकूण ३३७ उमेदवारी अर्ज दाखल होते, त्यापैकी १३७ उमेदवारांनी आज माघार घेतली. काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या डॉ. हेमलता पाटील तसंच राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष रंजन ठाकरे, भाजपाचे बंडखोर नेते शशिकांत जाधव आणि दिलीप भोसले यांचा समावेश आहे. मात्र, समीर भुजबळ, निर्मला गावित यांची उमेदवारी कायम आहे. जिल्ह्यात आता २०० उमेदवार रिंगणात आहेत.

**सांगली** जिल्ह्यात ८५ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहेत. **सोलापूर** दक्षिण विधानसभा मतदारसंघातून माजी आमदार दिलीप माने यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. मोहोळमधून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सिद्धी कदम आणि रमेश कदम यांनी अपक्ष म्हणून दाखल केलेला अर्ज मागं घेतला. लातूर

जिल्ह्यातल्या ६ विधानसभा मतदारसंघातल्या १०६ उमेदवारांपैकी ८७ जणांनी आज माघार घेतली. **जालना** जिल्ह्यातल्या पाच विधानसभा मतदारसंघातून आज ११९ उमेदवारांनी आपले नामनिर्देशन अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे आता १०९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असतील.

**धुळे** जिल्ह्यातल्या पाच मतदार संघांमधल्या ४६ उमेदवारांनी माघार घेतली असून आता 56 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यापैकी धुळे शहर मतदारसंघातल्या १२ उमेदवारांनी माघार घेतली असून त्यात प्रहार पक्षाचे मनोज मोरे तसंच, मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या दोन उमेदवारांचा समावेश आहे. त्याखेरीज धुळे ग्रामीणमधून तीन, शिंदखेडातून १२, शिरपूरमधून ७, साक्रीतून १२ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहेत. **अकोला** जिल्ह्यातल्या ५ मतदारसंघात दाखल झालेल्या ११३ अर्जांपैकी ४३ उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे. **बीड** जिल्ह्यातील सहा मतदारसंघात २३८ जणांनी माघार घेतली आहे. **वाशिम** जिल्ह्यात रिसोड मतदारसंघातून ६ जणांनी तर वाशिम आणि कारंजा या तिन्ही मतदारसंघातून प्रत्येकी १६ उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. **बुलडाणा** जिल्ह्यात ७२ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहेत. **हिंगोली** जिल्ह्यातल्या तीन विधानसभा मतदारसंघातल्या १२६ उमेदवारांपैकी ७२ जणांनी अर्ज मागे घेतले आहेत. **नागपूर** ग्रामीणच्या उमरेड मतदारसंघातून माजी आमदार राजू पारवे यांनी आपला अर्ज मागे घेतला.

**<><><><><>**

कोल्हापूर उत्तर मतदारसंघात काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार मधुरिमा राजे यांनी अखेरच्या क्षणी अर्ज मागं घेतला. काँग्रेसनं राजेश लाटकर यांची उमेदवारी रद्द

करुन मधुरिमा राजे यांना उमेदवारी दिली होती. त्यामुळे लाटकर यांनी अपक्ष उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज भरला होता. त्यानंतर गेल्या काही दिवसांपासून माघारीसाठी राजेश लाटकर यांची मनधरणी करण्याचे प्रयत्न सुरू होते. मात्र लाटकर माघार घ्यायला तयार झाले नाहीत त्यामुळे मुदत संपण्याच्या १० मिनिटं आधी मधुरिमाराजे यांनीच अर्ज मागे घेतला.

<><><><><>

महाविकास आघाडीत जागावाटपाबद्दल शेतकरी कामगार पक्षाशी चर्चा झाली असून उरणची जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष लढवेल, तर अलिबाग, पेण आणि पनवेलमधून शेकापचे उमेदवार निवडणुकीत उतरतील, अशी माहिती उद्धव ठाकरे यांनी दिली आहे.

<><><><><>

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे. आपल्या सर्व उमेदवारांना अर्ज मागे घेण्याचं आवाहन त्यांनी केलं आहे. मित्रपक्षांनी उमेदवारांची यादी पाठवली नसल्यामुळे माघार घेत असल्याचं, त्यांनी आज सकाळी जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं बातमीदारांना सांगितलं. मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठीचा लढा यापुढेही सुरूच राहणार असल्याचं ते म्हणाले.

दरम्यान, या निर्णयाशी आपला काहीही संबंध नसल्याचा निर्वाळा शरद पवारांनी दिला.

<><><><><>

राज्यात महाविकास आघाडी १८० जागा जिंकेल, असा विश्वास काँग्रेसचे जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या निर्णयांचा महाविकास आघाडीला फायदा होईल, असा विश्वास थोरात यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी परिवर्तन महाशक्ती आघाडीनं १२१ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे.

छत्रपती संभाजीराजे, बच्चू कडू, राजू शेट्टी, वामनराव चटप, धनंजय जाधव यांच्यासह अनेक समविचारी नेत्यांची नागपूर इथं बैठक झाली. या बैठकीत ही यादी जाहीर करण्यात आली. कसलाही वाद न होता जागावाटप पूर्ण झालं असल्याचं छत्रपती संभाजीराजे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नागपूर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची तात्काळ बदली करण्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगानं दिले आहेत. काँग्रेस आणि इतर पक्षांच्या तक्रारीनंतर आयोगानं ही कारवाई केली आहे. पोलीस महासंचालक पदाचा कार्यभार मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्याकडे सोपवला आहे. नवीन महासंचालकांच्या नियुक्तीसाठी तीन वरिष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांची नावं पाठवण्याचे निर्देश निवडणूक आयोगानं राज्याच्या मुख्य सचिवांना दिले आहेत.

निवडणूक आयोगाच्या या आदेशाचं काँग्रेसनं स्वागत केलं आहे. पण रश्मी शुक्ला यांना हटवण्यास एवढा उशिर का लागला? असा प्रश्न काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. आता रश्मी शुक्ला यांना निवडणुकीच्या संदर्भातलं कोणतंही काम देऊ नये, असं त्यांनी म्हटलंय.

रश्मी शुक्ला यांच्या बदलीचा निर्णय अतिशय योग्य असल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दिली आहे.

रश्मी शुक्ला यांच्या कार्यकाळाला मुदतवाढ देण्यावरून नाना पटोले यांनी देवेंद्र फडनवीस यांच्यावर बेछूट आरोप केले. मात्र, त्यांना त्याचे पुरावे द्यावे लागतील. पुरावे नसतील तर पटोले यांच्या विरुद्ध आम्ही निवडणूक आयोगाकडे तक्रार करू, असं भाजपाचे मुंबई प्रदेशाध्यक्ष आशीष शेलार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

रश्मी शुक्ला यांच्या बदलीनंतर मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, पोलीस सेवेतले वरिष्ठ अधिकारी संजय वर्मा आणि रितेश कुमार या तिघांच्या नावांची चर्चा या पदासाठी आहे.

**<><><><><>**

अमेरिकी अध्य पदाची निवडणूक आणि फेडरल रिझर्व्हच्या पतधोरण आढावा समितीची बैठक या दोन कारणांमुळं देशातल्या शेअर बाजारात आज मोठी घसरण झाली. सकाळी ११ वाजेच्या सुमाराला सेन्सेक्स आणि निफ्टी दिवसभरातल्या निचांकी पातळीवर होते. नंतर त्यात सुधारणा दिसून आली. दिवसअखेर सेन्सेक्स ९४२ अंकांनी घसरुन ७८ हजार ७८२ अंकांवर बंद झाला. निफ्टी ३०९ अंकांनी घसरुन २३ हजार ९९५ अंकांवर बंद झाला. जवळपास सर्वच क्षेत्रातल्या कंपन्यांच्या समभागात घसरण दिसून आली.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक अणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचे अर्ज भरायला मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार सहा ते १९ नोव्हेंबर या कालावधीत नियमित शुल्कासह, तर २० ते ३० नोव्हेंबर या कालावधीत विलंब शुल्कासह अर्ज भरता येईल.

**//<><><><><>//**